सकाळ

# कृतिशील शिक्षकच समाज परिवर्तन घडवू शकतो

## डॉ. नंदकुमार मोरे : गारगोटीत मराठी विषय सहविचार सभा

**▸ सकाळ वृत्तसेवा**

गारगोटी, ता. १ : 'कृतिशील समृद्ध शिक्षकच समाज परिवर्तन घडवू शकतो', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. येथील मौनी विद्यापीठाच्या उदाजीराव डी. एड. कॉलेजमध्ये आयोजित मराठी विषय समितीच्या सहविचार सभेत ते बोलत होते.

''दर्जेदार अध्यापनासाठी मराठी अध्यापकाकडे आवश्यक क्षमता'' याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे होते. प्राचार्या मंजूषा माळी व केंद्रप्रमुख संजय कुकडे प्रमुख उपस्थित होते. मुख्याध्यापक एम. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक डॉ. किरण गुरव यांच्या लेखनामागची प्रेरणा जाणून घेण्यासाठी त्यांची प्रकट मुलाखत शिक्षक सागर पाटील यांनी घेतली. या वेळी मुख्याध्यापक संतोष भोसले, प्रा. सुधीर गुरव, गुलाब लांडगे, सुभाष पाटील, एस, डी. खतकर यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापक बी. डी. कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. मेघा खाडे यांनी आभार मानले.





**गारगोटी : मराठी विषय समितीच्या सहविचार सभेत बोलताना डॉ. नंदकुमार मोरे. शेजारी गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, डॉ. किरण गुरव.**